| MHST090000892019 | दाखल दिनांक | : | १४-०१-२०१९ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | १४-०१-२०१९ |
| | निकाल दिनांक | : | ०५-०८-२०२६ |
| | कालावधी | : | व. म. दि. |
| | | | ०७ ०६ २१ |
| CNR. No.MHST090000892019 | | | |

नियमित फौजदारी खटला क्रमांक – २०/२०१९ निशाणी क्रमांक – १५६

(न्यायनिर्णय)

भाग – अ

| |
|---|
| कोरेगांव येथील न्यादंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्रमांक १, ता. कोरेगांव, जि. सातारा.<br>( पिठासण अधिकारी – चंद्रशिला एस. पाटील)<br>(०९/०१/२०२६)<br>(नियमित फौजदारी खटला क्रमांक २०/२०१९) |
| (भारतीय दंड संहिता कलम ४५२, १४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ आणि मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) ) |

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>कोरेगांव पोलीस स्टेशन, ता. कोरेगांव जि. सातारा. |
| अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता | | श्री. व्ही. एस. कोकाटे |
| आरोपी | | १. सुनिल गेणुबा सणस,<br>वयः– ३४ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>२. रमेश महादेव चव्हाण,<br>वयः– ६१ वर्षे, व्यवसायः– मजुरी,<br>३. अनिल गेणुबा सणस, |

| | | |
|---|---|---|
| | | वयः– ३४ वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | ४. **महेंद्र आनंदा सणस,** |
| | | वयः– ४३ वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | ५. **रुपेश सिताराम सपकाळ,** |
| | | वयः– ३२ वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | ६. **राजेंद्र मुकुंद पटेकर,** |
| | | वयः– ३० वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | ७. **देवानंद बाबुराव शिंदे,** |
| | | वयः– ४४ वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | ८. **ब्रम्हदेव दगडू चव्हाण,** |
| | | वयः– ७४ वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | ९. **सागर शामराव पटेकर,** |
| | | वयः– ३० वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | १०. **आशुतोष संजय भिलारे,** |
| | | वयः– २७ वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | ११. **सिध्दार्थ नारायण चव्हाण,** |
| | | वयः– ६१ वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | १२. **दिलीप मुकुंद पटेकर,** |
| | | वयः– ३९ वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | १३. **धमेद्र चिमाजी सणस,** |
| | | वयः– ४६ वर्षे, व्यवसायः– मजुरी, |
| | | १४. **उदय प्रकाश चव्हाण,** |
| | | वयः– ३९ वर्षे, व्यवसायः– सामाजिक कार्यकर्ता, |
| | | १५. **सुशीला रामस्वामी पेठेकर,** |
| | | वयः– ६० वर्षे, व्यवसायः– मजुरी, |

| | | |
|---|---|---|
| | | **१६. आशा मुकुंद पटेकर,**<br>वयः– ३५ वर्षे, व्यवसायः– मजुरी,<br>**१७. विठ्ठल सहदेव सणस,**<br>वयः– ४३ वर्षे, व्यवसायः– मजुरी,<br>**१८. उत्तम बाबुराव शिंदे,**<br>वयः– ४८ वर्षे, व्यवसायः– मजुरी,<br>**१९. संतोष रामचंद्र सणस,**<br>वयः– ४६ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>**२०. शिवाजी हरिभाऊ सणस,**<br>वयः– ५८ वर्षे, व्यवसायः– मजुरी,<br>सर्व रा. आसरे, ता. कोरेगांव, जि. सातारा. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | **श्री. डी. एम. बर्गे** |

**भाग - ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | | २४/०९/२०१८ |
| तक्रार दाखल दिनांक | | २५/०९/२०१८ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | | ०६/१२/२०२१ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | | ०९/०५/२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | | **निरंक** |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | **सुनिल गेणुबा सणस** | २५/०९/२०१८ | २६/०९/२०१८ | **४५२, १४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ आणि मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३)** | निर्दोष मुक्तता करण्यात आली. | निरंक | निरंक |
| **२** | **रमेश महादेव चव्हाण** | २५/०९/२०१८ | २६/०९/२०१८ | | | | |
| **३** | **अनिल गेणुबा सणस** | २५/०९/२०१८ | २६/०९/२०१८ | | | | |
| **४** | **महेंद्र आनंदा सणस** | २५/०९/२०१८ | २६/०९/२०१८ | | | | |
| **५** | **रुपेश सिताराम सपकाळ** | २५/०९/२०१८ | २६/०९/२०१८ | | | | |
| **६** | **राजेंद्र** | २५/०९/ | २६/०९/ | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुकुंद पटेकर | २०१८ | २०१८ | | | | |
| ७ | देवानंद बाबुराव शिंदे | २५/०९/ २०१८ | २६/०९/ २०१८ | | | | |
| ८ | ब्रम्हदेव दगडू चव्हाण | २५/०९/ २०१८ | २६/०९/ २०१८ | | | | |
| ९ | सागर शामराव पटेकर | २५/०९/ २०१८ | २६/०९/ २०१८ | | | | |
| १० | आशुतोष संजय भिलारे | २५/०९/ २०१८ | २६/०९/ २०१८ | | | | |
| ११ | सिध्दार्थ नारायण चव्हाण | २५/०९/ २०१८ | २६/०९/ २०१८ | | | | |
| १२ | दिलीप मुकुंद पटेकर | २५/०९/ २०१८ | २६/०९/ २०१८ | | | | |
| १३ | धर्मेंद्र चिमाजी | २५/०९/ २०१८ | २६/०९/ २०१८ | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सणस | | | | | | |
| १४ | उदय प्रकाश चव्हाण | २६/०९/२०१८ | २६/०९/२०१८ | | | | |
| १५ | सुशीला रामस्वामी पेठेकर | २५/०९/२०१८ | २६/०९/२०१८ | | | | |
| १६ | आशा मुकुंद पटेकर | २५/०९/२०१८ | २६/०९/२०१८ | | | | |
| १७ | विठ्ठल सहदेव सणस | ०५/१०/२०१८ | ०६/१०/२०१८ | | | | |
| १८ | उत्तम बाबुराव शिंदे | ०५/१०/२०१८ | ०६/१०/२०१८ | | | | |
| १९ | संतोष रामचंद्र सणस | ०६/१०/२०१८ | ०६/१०/२०१८ | | | | |
| २० | शिवाजी हरिभाऊ सणस | ०६/१०/२०१८ | ०६/१०/२०१८ | | | | |

## भाग – क

## सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार /बचावपक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार

### अ. अभियोगपक्ष

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | एकनाथ हरीभाऊ जरंडे | फिर्यादी | ८७ |
| २. | हरिष एकनाथ जरंडे | साक्षीदार | ८९ |
| ३. | तुकाराम सखाराम जरंडे | साक्षीदार | ९० |
| ४. | शरद लक्ष्मण भोसले | साक्षीदार | ९१ |
| ५. | दत्तात्रय कृष्णा घाडगे | पंच | ९७ |
| ६. | लता तुकाराम जरंडे | साक्षीदार | १०१ |
| ७. | वैभव विठ्ठल जगदाळे | पंच | १०५ |
| ८. | डॉ. संजय गजानन चिवटे | वैदयकीय अधिकारी | ११२ |
| ९. | सचिन पतंगराव साळुंखे | तपासी अधिकारी | ११८ |
| १०. | दिलीप दादू चौगुले | तपासी अधिकारी | १२० |

### ब. बचाव पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

## क. न्यायालयातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

## मुद्देमालाचे वर्णन –

| क्रमांक | मुद्देमाल क्रमांक /आर्टीकल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | | लाल रंगाचा महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर त्याचा आर. टी. ओ. नंबर एम. एच. ११ बी. ए. ८१०१ |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ०५/०८/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपी विरूध्द ४५२, १४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ आणि मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३)खालील अपराधाकरीता चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

२] फिर्यादी एकनाथ हरीभाऊ जरंडे मौजे आसरे ता. कोरेगाव जि. सातारा येथे त्यांची पत्नी सुनंदा व मुलगा हरिष असे एकत्रात राहणेस आहेत. त्यांची चहाची टपरी पंचायत समिती कोरेगाव येथे असुन त्यावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. चहाच्या टपरीवर ते सकाळी ०७.०० वाजता येतात व परत माघारी संध्याकाळी ०८.३० वा.चे सुमारास घरी जातात. दि. २४/०९/२०१८ रोजी रात्री ०८.३० वा.चे सु नेहमीप्रमाणे चहाची टपरी बंद करुन घरी जात

असताना चुलत भाऊ तुकाराम सखाराम जरंडे रा. आसरे ता. कोरेगाव जि.सातारा यांचे घरी कामानिमित्त गेले होते. त्यावेळी तेथे अशोक नामदेव सणस, वहीनी सौ लता तुकाराम जरंडे, नातु ओमकार असे घरात बसले असताना फिर्यादीचा मुलगा हरीष हा तेथे आला व फिर्यादीस म्हणाला की पैसे आणलेत का? त्यावर फिर्यादी त्याला '' आणलेत असे सांगुन घरी गेल्यावर तुला देतो असे म्हणाले'' तेवढ्यात रात्री ०९.०० वा.चे सु. काल गणपती विसर्जनामध्ये झाले बाचाबाचीचे कारणावरुन व निवडणुकीमध्ये झाले पराभवाचे कारणावरुन गावातील रुपेश सिताराम सपकाळ याने बाहेरुन एक्याला व ह–याला बाहेर पाठव असे म्हणुन शिव्या देऊन '' तुम्हाला सोडत नाही तुमच्यावर अॅट्रसिटीचे गुन्हे दाखल करतो'' असे म्हणुन आरडाओरडा करु लागला. म्हणुन फिर्यादीचा भाऊ तुकाराम बाहेर गेला त्याच्या पाठोपाठ फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा हरिष दरवाजापर्यंत गेले असता बाहेर धर्मराज चिमाजी सणस याचे ट्रॅक्टर ट्रॉलीतुन धर्मराज सणस, सुनिल गेणुबा सणस, रुपेश सिताराम सपकाळ, उदय प्रकाश चव्हाण, अनिल गेणुबा सणस, महेंद्र आनंदा सणस, राजेंद्र मुकुंद पेठेकर, दिलीप मुकुंद पेठेकर, सागर शामराव पेठेकर, आशुतोष भिलारे, संतोष रामचंद्र सणस, विठ्ठल सहदेव सणस, देवेंद्र बाबुराव शिंदे, उत्तम बाबुराव शिंदे, रमेश महादेव चव्हाण, सिध्दार्थ चव्हाण, ब्रम्हदेव दगडु चव्हाण, आशा पेठेकर, सुशिला पेठेकर, शिवाजी हरीभाऊ सणस व इतर बायकामुलांसह ५० जण होते. तेवढ्यात रुपेश सपकाळ, अनिल व सुनिल यांनी कंम्पाऊंडचे गेट ओढुन घरामध्ये येऊन हरिष यास बाहेर ओढुन मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यामुळे फिर्यादी गेटच्या बाहेर मुलाला सोडवण्यासाठी गेले असता फिर्यादीस देखील त्यांनी मारहाण करुन शिवीगाळ दमदाटी करण्यास सुरुवात केली. त्यानंतर भांडणामध्ये फिर्यादीच्या खिशातील पंधरा हजार रुपये व गळ्यातील सोन्याची दोन तोळ्याची चैन कोठे पडले हे समजले नाही. मारहाण चालु असताना मुलगा हरिष हा कोठेतरी पळुन गेला, त्यानंतर सर्वजण ट्रॅक्टरट्रली मध्ये बसुन निघुन गेले. घटनबाबत फिर्यादीने आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली.

३] सदर तक्रारीवरून आरोपीविरूद्ध गुन्हा क्रमांक २६३/२०१८ अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास तपासी अधिकारी श्री. डी. डी. चौगुले यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांचे टिपण घेतले. गुन्हयाचा तपास पुर्ण करून आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र पाठविले.

४] आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम, १८६० चे कलम ४५२, १४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ आणि मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अन्वये दोषारोप (नि. ६२ ) निश्चित केला. आरोपीने गुन्हा मान्य व कबुल नसल्याचे सांगुन खटला चालविणेची मागणी केली.

५] आरोपी वर गुन्हादर्शक परिस्थिती उपलब्ध झाल्याने आरोपींचे फौ. प्र. सं. कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र. १३० ते निशाणी क्र. १४९ वर नोंदविले आहेत. आरोपीने त्याच्या बचावामध्ये असे कथन केले आहे की, साक्षीदारांचे व आरोपींचे राजकीय वैमनस्य असल्यामुळे खोटी केस दाखल करुन खोटा पुरावा दिला आहे.

६] अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एस. कोकाटे यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. डी. एम. बर्गे यांचा युक्तिवाद ऐकला. न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विवेचनास उत्पन्न होतात, त्याचा निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, दि. २४/०९/२०१८ रोजी २१.०० वा.चे सुमारास मौजे आसरे ता. कोरेगांव गावचे हद्दीत आरोपी क्र. १ ते २० बेकायदेशीर जमावाचे घटक होते व जमावाचे समान उद्दीट साधण्यासाठी फिर्यादी, त्याचा मुलगा, चुलत भाऊ, त्यांची पत्नी व इतर साक्षीदार यांना दुखापत | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | करण्याच्या व त्यांच्यावर हमला करण्याची व गैरपणे दुखापतीची व भिती घालण्याची पुर्वतयारी करुन गृह अतिक्रमण केले व भारतीय दंड विधानचे कलम ४५२ सहकलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | |
| २. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते २० यांनी फिर्यादी व त्यांचा मुलगा यांना मारहाण करण्याचे उद्देशपुर्ती करीता बेकायदेशीर जमाव केला आणि त्यानुसार भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ३. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते २० बेकायदेशीर जमावाचे घटक होते व जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी दंगा केला आणि त्यानुसार भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ४. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते २० यांनी समान उद्देश पूर्तीकरीता बेकायदेशीर जमाव जमवून गणपती विसर्जनामध्ये झालेल्या बाचाबाचीचे कारणावरुन निवडणूकीत पराभव झालेच्या कारणावरुन फिर्यादीचे घरात शिरुन फिर्यादीस व व त्याचे मुलास धक्काबुक्की करुन हाताने व लाथा बुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली म्हणून भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ५. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते २० यांनी समान उद्देश पूर्तीकरीता फिर्यादीस व त्याचे मुलास शिवीगाळी करुन सार्वजनिक ठिकाणी शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले आणि त्यानुसार भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ सह १४९ शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ६. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते २० यांनी फिर्यादीस व त्याचा मुलगा व इतर साक्षीदारास दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदडपशाचा अपराध केला आणि त्यानुसार भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सह १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ७. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी मा. जिल्हाधिकारी सो. यांचे कडील आदेश क्र. डीसी/ एम.ए.जी/ २/ एस.आर/२९/२०१८ दिनांक १८/०९/२०१८ अन्वये दिनांक १६/०९/२०१८ ते ३०/०९/२०१८ पर्यंत जमावबंदीचा आदेश लागु होता. परंतु, आरोपी क्र. १ ते २० बेकायदेशीर जमावाचे घटक होते व जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशरी जमाव केला आणि त्यानुसार मुं. पो. का. कलम ३७(१) (३) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही.** |
| ८. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>*का र ण मि मां सा*</u>

**<u>मुद्दा नं.१ ते ७ करीता</u>–**

**(मुद्दे क्र.१ ते ७ चे उत्तर एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांची पुनरावृत्ती टाळ्याकरीता सर्व मुद्दे एकत्रीत चर्चेत घेण्यात येत आहेत.)**

७] आरोपी विरूद्ध गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने प्रामुख्याने हे शाबीत करणे गरजेचे आहे की, दि. २४/०९/२०१८ रोजी २१.०० वा.चे सुमारास मौजे आसरे ता. कोरेगांव गावचे हद्दीत आरोपी क्र. १ ते २० बेकायदेशीर जमावाचे घटक होते व जमावाचे समान उद्दीट साधण्यासाठी फिर्यादी, त्याचा मुलगा, चुलत भाऊ, त्यांची पत्नी व इतर साक्षीदार यांना दुखापत करण्याच्या किंवा त्यांच्यावर हमला करण्याची किंवा गैरपणे दुखापतीची व भिती घालण्याची पुर्वतयारी करुन गृह अतिक्रमण करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली तसेच मा. जिल्हाधिकारी सो. यांचे कडील आदेश क्र. डीसी/ एम.ए.जी/ २/ एस.आर/२९/२०१८ दिनांक १८/०९/२०१८ अन्वये दिनांक १६/०९/२०१८ ते ३०/०९/२०१८ पर्यंत जमावबंदीचा आदेश लागु होता. तरी देखील आरोपींनी बेकायदेशीर जमावाचे घटक होते व जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशरी जमाव केला.

८] आरोपीविरुद्धचा गुन्हा शाबीत करणेकरिता अभियोगपक्षाच्या वतीने एकूण दहा साक्षीदार तपासण्यात आले आहेत. साक्षीदार क्र. १ एकनाथ याने त्याच्या सरतपाामध्ये दिनांक २४/०९/२०१८ रोजी ते चहाच्या टपरी बंद करुन घरी जात असताना त्यांचा चुलत भाऊ तुकाराम याचा फोन आला होता. त्यामुळे ते तुकारामच्या घरी गेले. त्यावेळी त्याचे घरामध्ये त्याची पत्नी, अशोक सणस व त्यांचा नातू होता. त्यावेळी तेथे फिर्यादीचा मुलगा देखील आला व त्याने '' पैसे आणले का असे विचारले'' फिर्यादीने त्यास '' पैसे आणले आहेत घरी गेल्यावर देतो '' असे म्हणाले असता साधारण ०९.०० वाजणेच्या सुमारास बाहेरुन आवाज आला, '' ह–या, एक्या बाहेर ये, तुम्हाला दाखवितो, तुमच्यावर ऑट्रोसिटी करतो'' असे म्हणाला त्यावेळी त्यांनी फिर्यादीच्या मुलाला आता येवून बाहेर ओढून घेतले. त्यानंतर फिर्यादी बाहेर

गेला असता संतोष सणस, रुपेश सकपाळ, उदय चव्हाण, अनिल सणस यांनी त्यांना खाली पाडले. संतोष सणस यांने त्यांच्या गळयातील चैन ओढली व खिशातील पैसे काढून घेतले व खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण केली. तेथून त्यांचा मुलगा पळून गेला. आरोपी हे ट्रॅक्टर व ट्रॉली भरुन आले. त्यानंतर निशाणी क्र. ८८ प्रमाणे फिर्याद दाखल केली. ट्रॅक्टर व ट्रॉली धर्मेंद्र सणस यांची होती, त्यांच्या खिशात १५ हजार रुपये होते. त्यांची चैन दोन तोळयाची होती. ती त्यांना परत मिळाली नाही. साक्षीदाराने पुढे सांगितले की, ते अगोदर सरपंच पदाचा उमेदवार होते त्यावेळी आरोपी पार्टीचे तिकीट मिळाले नाही म्हणून विरोधी पक्षाचे काम केले. त्याच्या रागातून त्यांना मारहाण झाली तसेच गणपती विर्सजनावरुन राग धरुण मारहाण केली. उलटतपसादरम्यान त्यांच्या शरीरावर एकही जखम झाली नाही. खाली पडलो असे सांगितले परंतू पोलीसांनी ते जबाबामध्ये नमूद केले नाही. पोलीसांनी दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले नाही असा पुरावा दिला.

९] साक्षीदार क्र. २ हरिष याने दिनांक २४/०९/२०१८ रोजी ०८.३० वाजणेचे सुमारास चुलत्यांच्या घरी गेलो होतो त्यावेळी त्यांच्या घरामध्ये लोक उपस्थित होते. ते अर्धा तास तेथेच बसले. त्यानंतर ट्रॅक्टर व ट्रॉलीतून लोक ओरडत आले. थोडया अंतरावर त्यांच्या चुलत्यांच्या घरापुढे ट्रॅक्टर थांबला. रुपेश सकपाळ याने '' आप्पा बाहेर या'' असे चुलत्याला म्हणून व ह-या, एक्याला बाहेर पाठवा असे म्हणाला. त्यानंतर त्याचे चुलते गेटवर जावून थांबले. साक्षीदार त्यांच्या पाठीमागे उभा राहिला. त्यानंतर रुपेश सकपाळ , अनिल सणस व सुनिल सणस हे गेटमधून बाहेर आले व त्यांनी मारहाण करत साक्षीदारास बाहेर आणले व गटारीच्या स्लॅबर नेऊन मारहाण केली. त्या ठिकाणी ५० लोक होते. वडील सोडविण्यासाठी बाहेर आले असता त्यांना देखील मारहाण केली. सोडवासोडव करीत असताना साक्षीदार तेथून निघून गेला. साक्षीदाराने सर्व आरोपींना न्यायालयात ओळखले.

१०] साक्षीदार क्र. १ व २ हे घटनेचे मुख्य साक्षीदार असून साक्षीदार क्र. १ च्या म्हणण्याप्रमाणे घटना घडल्यानंतर साक्षीदार क्र. २ हा पळून गेला होता इथे मला आरोपीचे विधीज्ञांनी घेतलेली हरकत नमूद करणे आवश्यक वाटते. '' आरोपीच्या विधीज्ञांनी साक्षीदार क्र. १ एकनाथ याने साधारण ९.०० वाजता '' ह-या एक्या बाहेर ये '' असे बाहेरचे लोक बोलत

होते असा पुरावा दिला असून त्यांचा मुलगा घटनेनंतर पळून गेला असे कथन केले आहे. तर साक्षीदार क्र. २ याने त्याचे सरतपासामध्ये रुपेश सपकाळ याने आप्पा बाहेर या'' असे माझ्या चुलत्याला म्हणाला होता व ह–या व एक्याला बाहेर पाठवा असे म्हणाला. त्यानंतर सोडवासोडव करणेसाठी माझे वडील बाहेर आले. तर साक्षीदार क्र. ३ तुकाराम याने ते घरामध्ये बोलत असताना समोरच्या रस्त्यावरुन ट्रॅक्टरमधून लोक येवून गोंधळ झाल्याचा आवाज त्यांना आला. त्यानंतर त्यांना आप्पा ह–या व एकनाथ याला बाहेर पाठवून दया असा आवाज आला. सदर पुराव्याबाबत तिन्ही साक्षीदारांचा पुराव्यामध्ये विसंगती असून फिर्यादीमध्ये रुपेश याने आवाज दिला होता असा मजकूर नमूद आहे परंतू साक्षीदार क्र. १ एकनाथ याने त्याबाबत अवाक्षर काढले नसल्याबाबत हरकत उपस्थित केली. फिर्यादीमधील संबंधीत मजकूर पाहता फिर्यादीमध्ये रुपेश याने आवाज दिल्याचे नमूद केले आहे परंतू फिर्यादी साधारण ०९.०० वाजता आवाज आला, ह–या, एक्या बाहेर ये असे बाहेरचे लोक बोलत होते असा पुरावा दिला आहे. तिन्ही साक्षीदारांचा पुरावा व निशाणी क्र. ८८ वरील पुरावा पाहता रुपेश याने बाहेरुन बोलाविले होते याबाबत साक्षीदार क्र. २ याचे कथन आहे परंतू सदर कथनास साक्षीदार क्र. १ व ३ च्या पुराव्याने पुष्टी मिळाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे उलटतपासामध्ये घेतलेल्या हरकतीमध्ये काही अंशी तथ्य आहे. परंतू त्यामुळे संपूर्ण पुरावा दुर्लक्षित करता येणार नाही तर तो काळजीपूर्वक पाहणे महत्वाचे आहे.

११] साक्षीदार क्र. २ हरिष याने उलटतपासादरम्यान चुलत्याचे घरासमोर लाईट नव्हती. हॉलमधून चुलत्याच्या घरातून उत्तर बाजूच्या बाहेरचे काही दिसत नव्हते. ट्रॅक्टर व ट्रॉली चुलत्याच्या घराच्या उत्तर बाजूला रस्त्यावर होती. घटनेच्या आदल्या दिवशी दोन गटांमध्ये बाचाबाची झाली होती. साक्षीदाराने मारहाणीबाबत उपचार घेतले नाहीत तसेच त्यांच्या वडीलांना काय दुखापत झाली हे त्यास सांगता येणार नाही. साक्षीदाराने पुढे त्याचे वडीलांनी जबाबामध्ये काही मयत व्यक्तिची नावे आरोपी म्हणून घातली होती त्या संर्दभात त्यांचा पुरवणी जबाब नोंदविला होता याबाबत पुरावा दिला आहे.

१२] साक्षीदार क्र. ६ लता ही साक्षीदार क्र. ३ तुकाराम याची पत्नी असून तिने तिचे उलटतपासामध्ये दिनांक २४/०९/२०१८ रोजी ती घरामध्ये बसली असताना फिर्यादी

एकनाथ व साक्षीदार क्र. २ हरीष आले होते. रात्री ०९.०० वाजता ट्रॉली भरुन माणसे आली. रुपेश सकपाळ यांनी त्यांच्या पत्नीला हाक मारुन बाहेर बोलाविले. त्यानंतर अनिल, सुरेश व रुपेश यांनी साक्षीदार क्र. २ यास ओढून बाहेर नेले व मारहाण केली. त्याचे वडील त्यास सोडविण्यास गेले असता त्यांना देखील मारहाण केली.  सदर साक्षीदाराने हजर आरोपींना न्यायालयात ओळखले. उलटतपासादरम्यान दिनांक २४/०९/२०१८ रोजी त्या स्वयंपाक घरामध्ये होत्या. बाहेरचे लोक घरामध्ये आले नाहीत. रुपेश व सुनिल यांनी कोणती कपडे घातली होती ते त्यांना सांगता येणार नाही. आजूबाजूचे लोक गोळा झाले होते. फिर्यादी व साक्षीदार क्र. २ ला दुखापत झाली होती. एकनाथ व हरिची कपडे फाटली होती. पोलीसांना जबाब देताना ट्रॉली भरुन लोक आल्याचे सांगितले होते परंतू सदरचा मजकूर त्यांच्या जबाबामध्ये नमूद नाही.

**१३]** साक्षीदार क्र. ३ याने दिनांक २४/०९/२०१८ रोजी सायंकाळी ०८.०० ते ०८.१५ च्या सुमारास ते त्यांच्या कुटुंबात बसले होते त्यावेळी फिर्यादी व साक्षीदार क्र. २ त्यांचे घरामध्ये आले. ०८.१५ वाजणेच्या सुमारास ते सर्वजण बोलत असताना समोरच्या रस्त्याने ट्रॅक्टरमधून लोक येवून गोंधळ घातल्याचा आवाज आला. त्यावेळी ते घरातून बाहेर आहे. त्यावेळी सर्व लोक गेटसमोर आले. हरीष त्यांच्या पाठोपाठ त्यांच्या घराच्या पॅसेजमध्ये आला. त्यावेळी रुपेश सकपाळ, अनिल व सुनिल सणस हे घरामध्ये आले व त्यांनी हरीषला मारहाण करीत बाहेर नेले. त्यावेळी साक्षीदाराचे वडील भांडण सोडविण्यासाठी आले असता त्यांना देखील मारहाण करणेत आली. त्यांनी व त्यांच्या पत्नीने भांडणाची सोडवासोडव केली. त्यावेळी आरोपी तुमच्याविरुद्ध ॲट्रोसिटी करतो, पाय मोडतो असे म्हणून निघून गेले. त्यावेळी एकनाथ याचा खिसा फाटला होता. त्याने खिशातून पैसे व चैन गेल्याचे सांगितले.

**१४]** सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान सदर साक्षीदार धोम पाटबंधारे विभागात नोकरीस असून पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविल्याचे मान्य व कबूल केले. सदर साक्षीदाराने पुढे एकनाथला मुका मार लागला होता त्याच्या खिशातून १५ हजार रुपये गेला असल्याचा मजकूर पोलीसांना का सांगितला नाही याचे कारण सांगू शकत नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराचा उलटतपास विस्तृत असा नमूद केला असून त्याचे उलटतपासामध्ये कोणताही पुरावा

साक्षीदाराचे पुराव्यावरुन अविश्वास दाखविणारा आल्याचे दिसून येत नाही.

१५] साक्षीदार क्र. ५ दत्तात्रय याने दिनांक २५/०९/२०१८ रोजी घरी असताना पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी बोलाविले त्याप्रमाणे पंचनाम्यासाठी गेले. त्या ठिकाणी श्रीकांत सणस व तुकाराम सणस हजर होते. पोलीसांनी पंचनामा केला. घटनास्थळावर फोटो काढले ते निशाणी क्र. ९८ वर आहेत. उलटतपासादरम्यान चहाचे दुकान सकाळी ०८.०० ते संध्याकाळी ०८.०० पर्यंत चालू असते. ते नेहमीप्रमाणे चहाच्या दुकानावर दिनांक २५/०९/२०१८ रोजी गेले होते. पंचनाम्याला चार वाजता जावून पाच वाजता आले. घटनास्थळावरुन काहीही जप्त केले नाही. सदर साक्षीदाराने पुढे ते शेतात असताना पोलीसांनी त्यांना बोलाविले व नाव विचारुन सही करणेस सांगितले. त्यानंतर साक्षीदार शेतात निघून गेले व तुम्ही पंचनामा वाचून पाहिला नाही हा प्रश्न नकारार्थी नोंदविला.

१६] साक्षीदार क्र. ७ वैभव यास वाहन जप्ती पंचनामा शाबीत करणेकरीता तपासले असता साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केल्याचे दिसून येत नाही. अभियोगपक्षाने साक्षीदाराचा उलटतपास घेवून देखील अभियोगपक्षस उपयुक्त असा कोणताही पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसून येत नाही.

१७] साक्षीदार क्र. ८ वैदयकीय अधिकारी चिवटे यांच्या पुराव्यामध्ये त्यांनी फिर्यादीस तपासले होते. परंतू त्यांना कोणतीही दुखापत आढळून आली नाही. सदर रुग्ण पोलीस यादीसह आला होता. त्याप्रमाणे त्यांनी तपासणी केली व निशाणी क्र. ११३ वरील प्रमाणपत्र जारी केले. उलटतपासादरम्यान रुग्ण पोलीस यादीशिवाय आला होता हे कथन नाकारले तसेच कोणतीही दुखापत रुग्णाच्या शरीरावर पाहिली नव्हती हे कथन मान्य व कबूल केले आहे व पुढे असे कथन केले आहे की, सदर रुग्णास त्यांनी २५/०९/२०१८ रोजी ११.१५ वाजणेचे सुमारास तपासले होते. परंतू शरीराच्या कोणत्या भागावर दुखणे होते ही बाब प्रमाणपत्र निशाणी क्र. ११३ वर नमूद केलेले नाही.

१८] साक्षीदार क्र. ९ साळुंखे स्थानिक गुन्हे अन्वेषण सातारा यास फिर्याद दाखल केल्याचे तथ्य शाबीतीकरीता तपासले असल्याचे आढळून येते.

१९] साक्षीदार क्र. १० चौगुले तपासी अधिकारी यांनी दिनांक २५/०९/२०१८ रोजी ते कोरेगांव पोलीस ठाणेमध्ये पोलीस उपनिरिक्षक म्हणून कार्यरत होते. तपास त्यांच्याकडे वर्ग केल्यामुळे त्यांनी तोंडी आदेशान्वये तपासास सुरूवात केली. प्लॉट क्र. १८ चा पंचनामा केला. सदर मिळकतीचा उतारा निशाणी १२१ प्रकरणात दाखल केला आहे. पंचनाम्यावरील दोन साक्षीदार क्र २ व साक्षीदार क्र ३ हजर होते. ट्रॅक्टर जप्त केला होता. फिर्यादीमध्ये ज्या व्यक्तिचे नाव आरोपी म्हणून नमूद होते तो पूर्वीच मयत झाला होता तसा मृत्यूचा उतारा प्रकरणात हजर केला असून साक्षीदाराने पुढे असे कथन केले की, महादेव चव्हाण यांचा मयत दाखला असून त्यांचे नाव फिर्यादीमध्ये नमूद नाही. पुढे तपासादरम्यान पुरावा म्हणून आल्याने आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. जप्त केलेला ट्रॅक्टर ट्रॉलीसह न्यायालयाच्या आदेशाने परत केला.

२०] उलटतपासादरम्यान तपास काम आलेनंतर त्यांनी प्रथम खबरी अहवाल वाचला होता. तपासादरम्यान २१ आरोपी निष्पन्न झाले परंतू ४९ व्यक्तिंविरुद्ध फिर्याद दाखल होती. २१ आरोपींपैकी गुन्हयामध्ये कोणी कोणती भूमीका पार पाडली हे ते सांगू शकत नाहीत. तपासादरम्यान जखमींची कपडे जप्त केली नव्हती. पंचनाम्यादरम्यान घटनास्थळी शर्टची बटणे, चप्पल अथवा इतर काही वस्तू मिळून आल्या नाहीत. आश्चर्यकारकपणे तपासादरम्यान फिर्यादीच्या गळयातील चैन व खिशातील १५ हजार रक्कम आढळून आली नाही तसेच निष्पन्न देखील झाली नाही. घटनास्थळाचा पंचनामा दिनांक २५ रोजी केला. तपासादरम्यान व पंचनाम्यावेळी फिर्यादी त्यांच्या सोबत होता. घटनास्थळाच्या पंचनाम्याकरीता किंवा पंचनामा करीत असताना तारखेमध्ये खाडाखोड झाली होती. घटनास्थळाच्या पंचनाम्यावरुन काढणेत आलेल्या नकाशामध्ये मोजमापे नमूद नाहीत. गु. र. क्रमांक २६२ हा फिर्यादी व साक्षीदारांविरुद्ध दाखल असून दिनांक २५ रोजी हरीष यास अटक झालेबाबत त्यांना माहिती नाही परंतू दिनांक २६ रोजी साक्षीदार क्र. २ हरीष हा डी. वाय. एस. पी. यांचे ताब्यात होता किंवा कसे याबाबत सांगू शकत नाही. दिनांक २६/०९/२०१८ रोजी हरीष याचा जबाब नोंदविला नव्हता. सदर

साक्षीदाराने पुढे दोषारोपपत्रामध्ये हरीष याचा जबाब दिनांक २६/०९/२०१८ रोजी नोंदविला हे म्हणणे चुकीचे असल्याचे कथन केले.

२१] सदर तपासी अधिकारी यांनी उलटतपासामध्ये आर्टीकल अ वरील छायाचित्र कोणी काढले होते ते त्यांन सांगता येणार नाही. तसेच घटनेच्या वेळी आरोपी व फिर्यादी एका ठिकाणी हजर होते याबाबत तसे टॉवर लोकेशन घेतलेले नाही. मुंबई पोलीस कायदा अन्वये काढलेला प्रतिबंधात्मक आदेश वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध केला नव्हता. त्या वर्तमानपत्राची प्रत दोषारोपपत्रात दाखल केलेली नाही असा पुरावा दिला.

२२] साक्षीदार क्र. २ हरिष याचा पुरावा पाहिला असता साक्षीदाराने चुलत्यांच्या घराला तारेचे कंपाऊंड असून समोर अशोकाची झाडे आहेत, ग्रामपंचायतीची लाईट नाही. हॉलमधून चुलत्यांच्या घरातून उत्तर बाजूच्या रस्त्यावरील काही दिसत नाही व ट्रॅक्टर ट्रॉली ही चुलत्याच्या घराच्या उत्तर बाजूच्या रस्त्यावरुन दिसत नाही असे कथन केले आहे. तर साक्षीदार क्र. ६ लता हिने तिचे उलटतपासामध्ये ट्रॅक्टर पाहिला नव्हता याबाबत नकारार्थी उत्तर देवून घटनास्थळी जास्त गोंधळ झाला त्यामुळे त्यांची धडधड वाढली, गोंधळामध्ये कोण कोणाला काय म्हटले ते कळत होते. रुपेश सकपाळ हा ग्रामपंचायत सदस्य असून त्यांच्यामध्ये व रुपेशच्या पार्टीमध्ये वैमनस्य आहे. तसेच राजकीय मतभेद आहेत. साक्षीदार क्र. ६ लता यांनी हरीष व एकनाथला दुखापत झाली होती, हरीषच्या गळयाला दुखापत झाली होती असे कथन केले आहे. तर साक्षीदार क्र. ८ डॉ. चिवटे हे स्वःत वैदयकीय अधिकारी असून त्याने एकनाथ यास तपासले होते. त्यावेळी रुग्ण म्हणजे फिर्यादी त्याचे अंग दुखत असल्याचे सांगितले होते परंतू तपासणीदरम्यान कोणतीही जखम झाली नसल्याचे आढळून आल्याचे कथन केले आहे तसेच सदर रुग्ण हा पोलीस यादी घेवून आला होता याबाबत देखील कथन केल्याचे दिसून येते. त्याबाबत साक्षीदार क्र. १ याचा पुरावा पाहिला असता त्याने पोलीसांनी त्यास दवाखान्यात जाण्यास पत्र दिले. त्यास जखमा झाल्या नाहीत असे कथन केले आहे. तसेच पुढे त्यांचा मुलगा घटनेनंतर त्यांना परत भेटला नाही त्यामुळे त्यास जखमा झाल्या किंवा नाहीत याबाबत त्यास विचारले नाही व तीन महिन्यांनी विचारले असा पुरावा दिला आहे. सदर साक्षीदारांच्या पुराव्यामधील महत्वाच्या मुद्दयांवर विसंगती आढळून येते व त्याव्यतिरिक्त साक्षीदार क्र. २ यास

दुखापत झाली होती त्याचे गळ्याला जखम झाली होती असा पुरावा लता हिने दिला असला तरी तसे कोणतेही वैदयकीय प्रमाणपत्र पुराव्याकामी दाखल केलेले नाही. तसेच स्वतः हरीष साक्षीदार क्र. २ याने देखील त्याचे गळ्याला दुखापत झाल्याचे पुराव्यादरम्यान कोठेही कथन केलेले नाही. अशा परिस्थितीत साक्षीदारांचा पुरावा हा काळजीपूर्वक तपासणे आवश्यक वाटते कारण सर्व साक्षीदारांचा पुरावा हा महत्वाच्या दुखापतीच्या मुद्दयांवर विसंगती निर्माण करतो.

२३] सदर प्रकरणामध्ये महत्वाची बाब म्हणजे प्रकरणातील तपासी अधिकारी यांनी कथन केले की, साक्षीदार हरीष व इतर यांचेविरुद्ध अनूसूचित जाती व अनूसूचित जमाती अंतर्गत कायद्यान्वये कार्यवाहीकरीता साक्षीदार हरीष यास २५ रोजी अटक झालेबाबत त्यास माहिती नाही. दिनांक २६ रोजी हरीष हा डी. वाय. एस. पी. यांच्या ताब्यात होता याबाबत सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे तसेच पुढे '' हे म्हणणे खरे नाही की, दोषारोपपत्रामध्ये हरीष याचा जबाब २६/०९/२०१८ रोजी नोंदविला व तो जबाब दाखल केला आहे. परंतू तो चूकीचा आहे असा पुरावा दिला. आरोपीचे वतीने दाखल निशाणी क्र. १५१ वरील सही शिक्याची नक्कल पाहता हरीष यास दिनांक २६/०९/२०१८ रोजी ००.४४ वाजता अटक करणेत आली असल्याचे दिसून येते. साक्षीदाराचा जबाब पाहता तो २६/०९/२०१८ रोजी नोंदविल्याचे दिसून येते. जर साक्षीदारास त्याचे विरुद्धच्या गुन्हयामध्ये दिनांक २६/०९/२०१८ रोजी अटक करणेत आली होती तर साक्षीदाराचा जबाब दिनांक २६/०९/२०१८ रोजी नोंदविण्यात आला होता परंतू सदर जबाबावर अटकेत असल्याबाबत तशी नोंद का केली नाही याबाबत कोणतेही स्पष्टीकरण नाही त्यामुळे तपासी अधिकारी यांनी स्वतः दिनांक २६/०९/२०१८ रोजी हरिष याचा जबाब नोंदविला नव्हता असा पुरावा दिला आहे. याउलट साक्षीदार क्र. २ हरिष याचा पुरावा निश्चित किती तारखेला नोंदविण्यात आला किंवा तो नोंदविला होता का ? याबाबत अभियोगपक्षाच्या पुराव्यात संभ्रम निर्माण होतो व त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण अभिलेखावर आल्याचे दिसून येत नाही.

२४] सदर प्रकरणात पुढे नमूद करावीशी वाटणारी बाब म्हणजे उलटतपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी स्वतः तपासादरम्यान फिर्यादी एकनाथ याच्या गळयातील चैन व खिशातील १० हजार रुपये गहाळ झाले याबाबत आढळून आले नाही व निष्पन्न देखील झाले

नाही असे कथन केले आहे. त्यामुळे फिर्यादीचे कथनावर काही अंशी शंका निर्माण होते.

२५] सदर प्रकरणामध्ये साक्षीदारांचा वर नमूद संपूर्ण पुरावा व चर्चा पाहिली असता साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये महत्वाच्या मुद्दयावर विसंगती असल्याचे आढळून येते. साक्षीदार क्र. ६ लता हिने घटनास्थळी लोकांची गर्दी होती याबाबत कथन केले असले तरी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. साक्षीदार क्र. १ एकनाथ , साक्षीदार क्र. २ हरीष, साक्षीदार क्र. ३ तुकाराम, साक्षीदार क्र. ६ लता यांचे पुराव्यामध्ये आजूबाजूचे लोक जमा झाले असा पुरावा असला तरी प्रत्यक्षदर्शी स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब अभिलेखावर उपलब्ध नाही. अभियोग पक्षाच्या पुराव्यावरुन दोन्ही पक्षकारांचे राजकीय गट हे वेगवेगळे असून घटनेपूर्वी सदर प्रकरणातील आरोपींनी फिर्यादी यांच्या विरुध्द तक्रार दाखल केल्याचे सा.क्र.३ तुकाराम यांच्या पुराव्यावरुन दिसून येते. तशी कागदपत्रे आरोपींनी दाखल करुन तसा गुन्हा मा.जिल्हा न्यायालय सातारा येथे प्रलंबीत असल्याचे प्रथमदर्शनी दर्शविले आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमध्ये पूर्व वैमनस्य आहे. या सर्व बाबींवरुन तसेच वर नमूद संपूर्ण चर्चेवरुन आरोपीं विरुध्द गुन्हा शंके पलीकडे शाबीत न झाल्याने तसेच गुन्हयाची संपूर्ण साखळी अभियोग पक्षाने शाबीत न केल्याने आरोपींना संशयाचा फायदा देणे उचित होणार आहे. परिणामी **मुद्दा क्र.१ ते ७** चे उत्तर मी **एकत्रीतपणे नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा नं. ८ करीता</u>–**

२६] मुद्दा नं.१ च्या नकारार्थी निष्कर्षामुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. मा. अपिलीय न्यायालयात या निकालाविरुद्ध अपील दाखल झालेस उपस्थित राहणेसाठी आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे प्रत्येकी र.रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे. तरी वर नमूद संपूर्ण चर्चेवरुन मुद्दा नं. ८ चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १ | आरोपी क्र. **१ ते २० सुनिल गेणुबा सणस, रमेश महादेव चव्हाण, अनिल गेणुबा सणस, महेंद्र आनंदा सणस, रुपेश सिताराम सपकाळ, राजेंद्र मुकुंद पेटेकर, देवानंद बाबुराव शिंदे, ब्रम्हदेव दगडू चव्हाण,सागर शामराव पेटेकर, आशुतोष संजय भिलारे, सिध्दार्थ नारायण चव्हाण, दिलीप मुकुंद पेटेकर, धमेद्र चिमाजी सणस, उदय प्रकाश चव्हाण,सुशीला रामस्वामी पेटेकर,आशा मुकुंद पटेकर,विठ्ठल सहदेव सणस,उत्तम बाबुराव शिंदे, संतोष रामचंद्र सणस, शिवाजी हरिभाऊ सणस यांना** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये, ४५२, १४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ आणि मुंबई पोलीस कायदा कलम ३७(१)(३)अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपीचा जामीन कतबा व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे. |
| ३ | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये प्रत्येकी र.रु.१५,०००/- चा लायक जामीनदाराचा जामीन कतबा व जातमुचलका देणेचा आहे. |
| ४ | सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल लाल रंगाचा महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर त्याचा आर. टी. ओ. नंबर एम. एच. ११ बी. ए. ८१०१ चा अंतरिम ताबा मूळ मालकास दिला असेल तर तो सदर प्रकरणात अपील कालावधीनंतर अपील न झाल्यास त्याचा ताबा कायम करणेत यावा. |

*(खुल्या न्यायालयात घोषीत केला.)*

कोरेगांव.
दि. ०५/०८/२०२६

**(चंद्रशिला एस. पाटील)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव
ता.कोरेगाव, जि.सातारा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करण्यात येते की, वरील न्यायनिर्णय हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखक – श्री. एन. डी. खुस्पे

न्यायालय – प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव

न्यायनिर्णय संक्रमित दिनांक –०९/०१/२०२६

लघुलेखक